नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

दैनिक
यश सिद्धि न्यूज
संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - ४ थे Year - 4rd | अंक - १६६ Issue - 166 | वार - शुक्रवार दि. १३ नोव्हेंबर २०२६ Blow- Friday Date 13 NOVEMBER 2026 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amout - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

रब्बी हंगामातील खतांसाठी ६२३७० कोटींचे अनुदान मंजूर

केंद्र सरकारचा मोठा निर्णय; मुद्रा योजनेसाठी ५००० कोटींना मंजुरी

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

नवी दिल्ली : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या कॅबिनेट बैठकीत खतांच्या खरेदीसाठी ६२३७० रुपये निश्चित केले आहेत. मुद्रा योजनेतही काही बदल केले गेलेत. केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांनी कॅबिनेट संपल्यानंतर निर्णयांची माहिती दिली. यामध्ये कृषी, कर्जापर्यंत पोहोच आणि सांस्कृती रुढ पद्धतीसंदर्भात बदल करण्यात आलेत.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखालील केंद्रीय मंत्रिमंडळाने आज फॉस्फेटयुक्त आणि पोटॅशयुक्त खतांवर रब्बी हंगाम २०२६-२७ (०१.१०.२०२९ ते ३१.०३.२०२७) साठी 'न्यूट्रिएंट बेस्ड सबसिडी' दरांना मंजुरी दिली आहे. रब्बी २०२६-२७ साठी अंदाजे ६२,३७०.०२ कोटी रुपयांच्या अर्थसंकल्पीय तरतुदीची आवश्यकता असेल. हे प्रमाण रब्बी २०२५-२६ हंगामाच्या तुलनेत सुमारे २४,४१७.७३ कोटी रुपयांनी अधिक आहे. रब्बी २०२५-२६ साठीचे बजेट ३७,९५२.२९ कोटी रुपये इतके होते. केंद्रीय मंत्रिमंडळानं ऑक्टोबर ते मार्च या कालावधीसाठी ६२३७० कोटींच्या खर्चाला मजुरी दिली आहे.



शेतकऱ्यांना सवलतीच्या, परवडणाऱ्या आणि रास्त दरांत खतांची उपलब्धता सुनिश्चित केली जाईल.खते व कच्च्या मालाच्या आंतरराष्ट्रीय किमतींमधील अलीकडील बदल लक्षात घेऊन झघ खतांवरील अनुदानाचे सुसूत्रीकरण. शेतकऱ्यांना परवडणाऱ्या दरांत खतांचा सुरळीत पुरवठा व्हावा यासाठी, डीएपी आणि एनपीकेएस यासह सर्व प्रकारच्या पी अँड के खतांवर रब्बी हंगाम २०२६-२७ च्या मंजूर दरांनुसार (०१.१०.२०२६ ते ३१.०३.२०२७ पर्यंत लागू) अनुदान दिले जाईल. सरकार खत उत्पादक आणि आयातदारांच्या माध्यमातून डीएपीसह पी अँड के खतांचे २८ प्रकार सवलतीच्या दरात शेतकऱ्यांना उपलब्ध करून देत आहे. पी अँड के खतांवरील हे अनुदान ०१.०४.२०१० पासून 'न्यूट्रिएंट बेस्ड सबसिडी' योजनेद्वारे नियंत्रित केले जाते. आपल्या शेतकरी केंद्रित धोरणाला अनुसरून, शेतकऱ्यांना परवडणाऱ्या दरांत पी अँड के खते उपलब्ध करून देण्यासाठी सरकार कटिबद्ध आहे.

युरिया, डीएपी, एमओपी आणि गंधक (सल्फर) यांसारख्या खतांच्या व कच्च्या मालाच्या आंतरराष्ट्रीय किमतींमधील अलीकडील बदल विचारात घेऊन, सरकारने डीएपी आणि एनपीकेएससह फॉस्फेटयुक्त आणि पोटॅशयुक्त खतांवर ०१.१०.२०२६ ते ३१.०३.२०२७ या रब्बी २०२६-२७ हंगामासाठी एनबीएस दरांना मंजुरी देण्याचा निर्णय घेतला आहे. खत कंपन्यांना मंजूर आणि अधिसूचित दरांनुसार हे अनुदान प्रदान केले जाईल, जेणेकरून शेतकऱ्यांना योग्य व परवडणाऱ्या किमतीत खते मिळतील.

शिकाऊ विमानाचा उड्डाणापूर्वीच अपघात

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

मुंबई : महाराष्ट्रातील सोलापूर विमानतळावर गुरुवारी एक अत्यंत थरारक आणि धक्कादायक घटना घडली आहे. विमान चालवण्याचे प्रशिक्षण घेणाऱ्या एका लहान विमानाचे (ट्रेनिंग एअरक्राफ्ट) धावपट्टीवर अचानक 'हार्ड लँडिंग' (अतिशय जोरदार आणि आपत्कालीन पद्धतीने खाली उतरणे) झाले. या तांत्रिक बिघाडामुळे हे विमान थेट धावपट्टीवरच अडकून पडल्याचे पाहायला मिळाले.



सोलापूर विमानतळावर लँडिंग करताना घडली दुर्घटना; महिला वैमानिकाचा थोडक्यात जीव वाचला, धावपट्टीवर धावपळ

महिला प्रशिक्षणार्थीचे 'सोलो क्रॉस कंट्री' उड्डाण

मिळालेल्या माहितीनुसार, 'रेडबर्ड एव्हिएशन ट्रेनिंग अकादमी' मध्ये पायलटचे प्रशिक्षण घेत असलेली एक महिला विद्यार्थी विमान चालवण्याचे शिक्षण घेत होती. यादरम्यान ती आपले 'सोलो क्रॉस कंट्री' (एकटीचे लांब पल्ल्याचे) उड्डाण करत होती. तिचे हे महत्त्वाचे उड्डाण सुरू असतानाच, विमान सोलापूर विमानतळाच्या धावपट्टीवर उतरत असताना तांत्रिक किंवा इतर काही कारणांमुळे त्याचे नियंत्रण सुटले आणि त्याचे हार्ड लँडिंग झाले. या अनपेक्षित प्रकारामुळे विमान धावपट्टीवरच अडकून पडले.

विमानाचे लँडिंग इतके जोरदार आणि अचानक झाले की ते धावपट्टीवर एका धोकादायक कोनात अडकले. मात्र, या भीषण घटनेत सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नसल्याची माहिती 'रेडबर्ड एव्हिएशन ट्रेनिंग अकादमी'चे प्रतिनिधी करण मान यांनी दिली आहे. या अपघातात महिला पायलट वा इतर कोणालाही कोणतीही दुखापत झालेली नाही, ज्यामुळे एक मोठी दुर्घटना टळता टळली आहे.

घटनास्थळी तातडीने सुरक्षा आणि मदत यंत्रणा दाखल

या दुर्घटनेनंतरचा एक व्हिडिओ समोर आला आहे, ज्यामध्ये 'टेक्नाम पी मेंटोर' कंपनीचे हे प्रशिक्षणार्थी विमान धावपट्टीवर एका बाजूला झुकलेल्या स्थितीत अडकलेले स्पष्टपणे दिसत आहे. घटनेची माहिती मिळताच विमानतळ प्राधिकरणाने तातडीने पावले उचलली. सुरक्षेची खबरदारी म्हणून तातडीने सुरक्षा अधिकारी, वैद्यकीय पथक आणि अग्निशामक दलाचे जवान घटनास्थळी दाखल झाले. तिथे परिस्थितीचा आढावा घेण्यात आला असून, घटनास्थळी एक रुग्णवाहिका (अम्युलन्स) आणि एक अग्निशामक बंब (फायर इंजिन) देखील तैनात असल्याचे व्हिडिओमध्ये दिसून आले आहे.

विकासाच्या नावाखाली निसर्गावर वर्चस्व गाजवू नका, विकासाला मर्यादा घाला; मोहन भागवतांनी अप्रत्यक्षपणे सरकारला सुनावलं!

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

नागपूर : विकासाच्या नावाखाली निसर्गावर वर्चस्व गाजविण्याची मानसिकता सोडण्याची वेळ आली आहे. मनुष्य हा निसर्गाचा स्वामी नसून संपूर्ण विश्वाचा एक भाग आहे. त्यामुळे निसर्ग, जैवविविधता आणि पर्यावरण यांचे संतुलन राखल्याशिवाय मानवी जीवन सुखी होऊ शकत नाही. त्यासाठी माणसाने स्वतःवर काही निर्बंध घालून घेणे आवश्यक आहे, असा संदेश राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक डॉ. मोहन भागवत यांनी दिला. आधुनिक विकासाच्या संकल्पनांचा विचार करताना पर्यावरण आणि भारतीय पारंपरिक ज्ञानाकडे दुर्लक्ष करू नका, असा अप्रत्यक्ष सल्लाही त्यांनी सरकारला दिला.

जगाला आता 'वन हेल्थ' ही संकल्पना समजू लागली आहे. मात्र, निसर्ग आणि मानव यांच्यातील परस्परावलंबित्व भारतीय जीवनपद्धतीत पूर्वीपासूनच मान्य करण्यात आले आहे, असे भागवत यांनी स्पष्ट केले. पूर्वी माणूस स्वतःला निसर्गाचा स्वामी समजत होता. मात्र, आपण निसर्गासह एका विश्वाचा भाग आहोत. आपले अस्तित्व निसर्गावर आणि एकमेकांवर अवलंबून आहे. त्यामुळे जैवविविधता (बायोडायव्हर्सिटी), पर्यावरण (इकॉलॉजी) आणि संपूर्ण परिसंस्था निरोगी असतील, तरच मनुष्य सुखी राहू



शकतो. केवळ मानवी विकासाचा विचार करून चालणार नाही, तर निसर्गाच्या हिताचाही विचार करावा लागेल, असे त्यांनी सांगितले.

आजचे जग अनेक ठेचा खाऊन अनुभवातून पुढे जात आहे. मात्र, आपल्या पूर्वजांनीही अनेक अनुभवांतून जीवनपद्धती विकसित केली होती. निसर्गाशी सुसंगत राहण्याचे ज्ञान भारतीय परंपरेतून पिढ्यान्पिढ्या पुढे आले आहे. आता जगाला या गोष्टींचे महत्त्व पटू लागले आहे. त्यामुळे आपल्या पारंपरिक ज्ञानाचा अभ्यास करून त्याच्या आधारावर जगाला विकासाचा नवा मार्ग दाखविण्याची जबाबदारी भारताची आहे, असेही भागवत म्हणाले.

दिवाळीतील वसुबारस आणि गोवर्धन पूजेचा संदर्भ देताना त्यांनी भारतीय परंपरांमागील वैज्ञानिक दृष्टिकोन स्पष्ट केला. आपण गाईच्या शेणापासून गोवर्धन तयार करतो. गाईच्या शेणाचाही उपयोग आहे, हे आता जग मान्य करू लागले आहे. काही वर्षांपूर्वी अशा परंपरांमुळे जग आपली हेटाळणी करत होते; मात्र आता परिस्थिती बदलत आहे. आपल्या पूर्वजांनी जपलेल्या जीवनपद्धतीमागील महत्त्व जगाला समजू लागले आहे, आपल्याकडे गीरसारख्या देशी गायी होत्या. त्यांच्या क्षमतेत वाढ करण्याची संधी असतानाही आपण त्याकडे दुर्लक्ष केले. उलट जर्सी आणि परदेशी गायी आणण्यावर भर दिला. भारतीय गायींच्या दुधातील गुणधर्म सुधारण्यासाठी सुमारे तीनशे वर्षांपूर्वी भारतातील गायी परदेशात नेण्यात आल्या होत्या. परदेशाने त्यावर संशोधन केले; मात्र आपण आपल्या संसाधनांकडे अपेक्षित लक्ष दिले नाही, अशी खंत त्यांनी व्यक्त केली.

आपल्याकडे असलेल्या ज्ञानाच्या आणि संसाधनांच्या आधारावर विकास केला पाहिजे. स्वावलंबनातूनच मनुष्य स्वतंत्र होतो. प्रत्येक राष्ट्राने स्वतःच्या विकासातून जगाचाही विकास झाला पाहिजे, असा विचार ठेवायला हवा. भारतीय शास्त्र आणि ज्ञानपरंपरेत स्वावलंबी होण्यासाठी अनेक मार्ग आहेत. या ज्ञानाच्या आधारावर नवी जीवनपद्धती विकसित करणे ही आपली जबाबदारी आहे, असंही मोहन भागवत म्हणाले.

जम्मू-काश्मीरमध्ये दहशतवाद्यांचा हल्ला, दोन जवानांची गोळ्या झाडून हत्या

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

श्रीनगर : जम्मू-काश्मीरमधील किश्तवाड जिल्ह्यातून एक धक्कादायक घटना समोर आली आहे. बुधवारी बेपत्ता झालेल्या दोन स्पेशल पोलीस ऑफिसर (डझज) जवानांचे मृतदेह गुरुवारी दच्छन परिसरातील जंगलात आढळून आले. दोन्ही जवानांची गोळ्या झाडून हत्या करण्यात आल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे. या घटनेनंतर परिसरात खळबळ उडाली असून, हल्ल्यात सहभागी असलेल्या दहशतवाद्यांचा शोध घेण्यासाठी सुरक्षा दलांकडून मोठ्या प्रमाणावर शोधमोहीम सुरू करण्यात आली आहे.

बुधवारी किश्तवाड जिल्ह्यातील दच्छन परिसरातील उंच डोंगराळ आणि घनदाट जंगल असलेल्या भागातून दोन्ही डझज जवान बेपत्ता झाले होते. त्यांचा शोध घेण्यासाठी सुरक्षा यंत्रणांनी व्यापक मोहीम हाती घेतली होती.या शोधमोहिमेत दुर्गम डोंगराळ भाग आणि जंगलांमध्ये विशेष पथके तैनात करण्यात आली होती.

जवानांचा शोध घेण्यासाठी ड्रोन तसेच प्रशिक्षित श्वानपथकांचीही मदत घेण्यात आली.अखेर गुरुवारी शोधमोहिमेदरम्यान दच्छनच्या जंगलात दोन्ही जवानांचे मृतदेह आढळून आले. मिळालेल्या माहितीनुसार, ज्या ठिकाणाहून ते बेपत्ता झाले होते, त्या ठिकाणापासून सुमारे दोन किलोमीटर अंतरावर त्यांचे मृतदेह सापडले.

बुधवारपासून होते बेपत्ता

दोन्ही जवानांच्या शरीरावर गोळ्यांच्या अनेक जखमा आढळल्या आहेत.मृत जवानांची नावे बाबी चंद आणि रशपाल कुमार अशी आहेत. बाबी चंद यांचे वय ५७ वर्षे, तर रशपाल कुमार यांचे वय ४५ वर्षे होते.



संपादकीय....

निसर्गावर वर्चस्व नको

विकासाच्या नावाखाली निसर्गावर वर्चस्व गाजविण्याची मानसिकता सोडण्याची वेळ आली आहे. मनुष्य हा निसर्गाचा स्वामी नसून संपूर्ण विश्वाचा एक भाग आहे. त्यामुळे निसर्ग, जैवविविधता आणि पर्यावरण यांचे संतुलन राखल्याशिवाय मानवी जीवन सुखी होऊ शकत नाही. त्यासाठी माणसाने स्वतःवर काही निर्बंध घालून घेणे आवश्यक आहे, असा संदेश नुकतेच राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक डॉ. मोहन भागवत यांनी दिला. आधुनिक विकासाच्या संकल्पनांचा विचार करताना पर्यावरण आणि भारतीय पारंपरिक ज्ञानाकडे दुर्लक्ष करू नका, असा अप्रत्यक्ष सल्लाही त्यांनी सरकारला दिला. जगाला आता 'वन हेल्थ' ही संकल्पना समजू लागली आहे. मात्र, निसर्ग आणि मानव यांच्यातील परस्परावलंबित्व भारतीय जीवनपद्धतीत पूर्वीपासूनच मान्य करण्यात आले आहे. पूर्वी माणूस स्वतःला निसर्गाचा स्वामी समजत होता. मात्र, आपण निसर्गासह एका विश्वाचा भाग आहोत. आपले अस्तित्व निसर्गावर आणि एकमेकांवर अवलंबून आहे. त्यामुळे जैवविविधता (बायोडायव्हर्सिटी), पर्यावरण (इकॉलॉजी) आणि संपूर्ण परिसंस्था निरोगी असतील, तरच मनुष्य सुखी राहू शकतो. केवळ मानवी विकासाचा विचार करून चालणार नाही, तर निसर्गाच्या हिताचाही विचार करावा लागेल. आजचे जग अनेक ठेचा खाऊन अनुभवातून पुढे जात आहे. मात्र, आपल्या पूर्वजांनीही अनेक अनुभवांतून जीवनपद्धती विकसित केली होती. निसर्गाशी सुसंगत राहण्याचे ज्ञान भारतीय परंपरेतून पिढ्यान्पिढ्या पुढे आले आहे. आता जगाला या गोष्टींचे महत्त्व पटू लागले आहे.

धर्मांधतेने ग्रासलेल्या लोकशाहीला संविधानाची गरज आहे!


दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

धर्मांधता लोकशाहीला पोखरते, तर संविधान लोकशाहीला बळ देते. धार्मिक कट्टरता, बहुसंख्याकवाद आणि सामाजिक द्वेषाच्या वातावरणात भारतीय संविधान हेच सर्वसामान्य माणसाच्या स्वातंत्र्याचे, समानतेचे आणि न्यायाचे सर्वात मोठे संरक्षण आहे.

लोकशाही म्हणजे केवळ निवडणुका घेणे, बहुमताने सरकार स्थापन करणे किंवा सत्तेवर येणे नव्हे, तर देशातील प्रत्येक नागरिकाला समान अधिकार, सन्मान, स्वातंत्र्य आणि न्याय मिळण्याची हमी देणारी व्यवस्था होय. मात्र, जेव्हा लोकशाही धर्मांधता, धार्मिक कट्टरता, जातीय द्वेष आणि बहुसंख्याकवादाच्या विळख्यात अडकते, तेव्हा तिच्या मूळ उद्देशालाच धोका निर्माण होतो. अशा परिस्थितीत लोकशाहीला वाचविण्यासाठी आणि अधिक सुदृढ करण्यासाठी भारतीय संविधानाची नितांत आवश्यकता असते.

आज देशात धार्मिक ध्रुवीकरण आणि धर्माच्या नावावर राजकीय वातावरण तापविण्याचे प्रयत्न होताना दिसतात. राष्ट्रीय स्वयंसेवक संघ देशात हिंदू एकतेची संकल्पना मांडत असला, तरी त्या एकतेच्या संकल्पनेत दलित, अल्पसंख्याक आणि महिलांच्या समान हक्कांना कितपत स्थान आहे, हा प्रश्न उपस्थित होणे स्वाभाविक आहे. कारण खरी एकता ही केवळ धार्मिक आधारावर उभी राहत नाही, तर ती समानता, स्वातंत्र्य, न्याय आणि बंधुभाव या मूल्यांवर उभी राहते.

देशात अन्याय, अत्याचार आणि सामाजिक विषमतेच्या घटना घडत असताना सत्ताधाऱ्यांनी मौन न बाळगता जबाबदारीने भूमिका घेणे अपेक्षित आहे. लोकशाहीत सत्ताधाऱ्यांची जबाबदारी केवळ सत्ता टिकविण्याची नसून प्रत्येक नागरिकाच्या जीविताचे, स्वातंत्र्याचे आणि अधिकारांचे संरक्षण करण्याची असते.



इतिहासातील जालियनवाला बाग हत्याकांडाची आठवण करून देताना सत्तेच्या दडपशाहीचे भयावह परिणाम लक्षात घ्यावे लागतात. जनरल डायरने निरपराध नागरिकांवर गोळीबार करून अमानुष दडपशाहीचे दर्शन घडविले होते. त्याचप्रमाणे मध्य प्रदेशातील मंदसौर येथे २०१७ मध्ये शेतकरी आंदोलनादरम्यान झालेल्या गोळीबाराने लोकशाही व्यवस्थेतील सत्तेच्या उत्तरदायित्वाचा गंभीर प्रश्न उपस्थित केला. शेतकऱ्यांच्या प्रश्नांना संवादातून उत्तर देण्याऐवजी हिंसक मार्गाचा अवलंब होणे ही लोकशाहीसाठी चिंतेची बाब आहे.

म्हणूनच देशाला कोणत्याही संघटनेच्या विचारधारेनुसार बदललेल्या संविधानाची नव्हे, तर महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नेतृत्वाखाली संविधानसभेने घडविलेल्या भारतीय संविधानातील समता, स्वातंत्र्य, न्याय आणि बंधुतेच्या मूल्यांची खरी गरज आहे.

संविधान : लोकशाहीचे संरक्षण करणारे अभेद्य कवच

१. कायद्याचे राज्य आणि समानतेचा अधिकार

भारतीय संविधानाच्या कलम १४ नुसार प्रत्येक व्यक्ती कायद्यासमोर समान आहे. नागरिक कोणत्या धर्माचा, जातीचा किंवा पंथाचा आहे, यावर त्याचे अधिकार ठरत नाहीत. कायद्यापेक्षा कोणीही मोठे नाही, हीच लोकशाहीची खरी ताकद आहे. धार्मिक भावना किंवा राजकीय विचारधारा यांच्यापेक्षा संविधान आणि कायद्याचे राज्य सर्वोच्च असले पाहिजे.

२. मूलभूत अधिकारांचे संरक्षण

संविधानातील कलम १९, २१ आणि २५ ते ३० नागरिकांच्या स्वातंत्र्याचे आणि अधिकारांचे संरक्षण करतात. प्रत्येकाला अभिव्यक्तिस्वातंत्र्य, प्रतिष्ठेने जगण्याचा अधिकार आणि धर्मस्वातंत्र्य प्राप्त आहे. अल्पसंख्याक समाजाला आपल्या धार्मिक, सांस्कृतिक आणि शैक्षणिक परंपरा जपण्याचा अधिकार संविधानाने दिला आहे. कोणत्याही नागरिकावर विशिष्ट धर्म स्वीकारण्याची किंवा त्याचे पालन करण्याची सक्ती करता येत नाही.

३. धर्मनिरपेक्षतेचे महत्त्व

भारतीय संविधानाची धर्मनिरपेक्षता ही लोकशाहीचा महत्त्वपूर्ण आधारस्तंभ आहे. राज्याचा स्वतःचा कोणताही अधिकृत धर्म नसून सर्व धर्मांच्या नागरिकांना समान वागणूक देणे हे राज्याचे कर्तव्य आहे. धर्माच्या आधारावर नागरिकांमध्ये भेदभाव होऊ नये, ही संविधानाची मूलभूत भूमिका आहे. शासनाने धार्मिक पक्षपात न करता सर्व नागरिकांच्या हिताचे रक्षण केले पाहिजे.

४. लोकशाही संस्थांचे स्वातंत्र्य आणि संतुलन

संसद, कार्यपालिका आणि न्यायपालिका या लोकशाहीच्या महत्त्वपूर्ण संस्था आहेत. संविधानाने त्यांच्यात अधिकारांचे संतुलन निर्माण केले आहे. न्यायव्यवस्था नागरिकांच्या मूलभूत अधिकारांचे संरक्षण करते. सर्वोच्च न्यायालय आणि उच्च न्यायालयांना घटनाबाह्य कायदे व शासनाचे निर्णय न्यायिक पुनरावलोकनाद्वारे तपासण्याचा अधिकार आहे. स्वतंत्र आणि निष्पक्ष संस्था असतील तरच लोकशाही टिकून राहू शकते.

५. सामाजिक ऐक्य आणि बंधुभाव

भारत हा विविध भाषा, धर्म, जाती, संस्कृती आणि परंपरांनी नटलेला देश आहे. या विविधतेतून राष्ट्रीय एकात्मता निर्माण करण्याचे काम संविधान करते. संविधानाच्या उद्देशिकेत न्याय, स्वातंत्र्य, समता आणि बंधुता या मूल्यांना विशेष महत्त्व दिले आहे. धार्मिक द्वेष आणि जातीय संघर्ष संपविण्यासाठी बंधुभावाची भावना समाजात रुजणे अत्यंत आवश्यक आहे.

धर्मापेक्षा माणुसकी श्रेष्ठ!



धर्माच्या नावावर माणसामाणसांत भिंती उभ्या केल्या जात असतील, तर त्या धर्माच्या सामाजिक भूमिकेचा पुनर्विचार करण्याची वेळ येते. धर्माच्या अंधानुकरणामुळे विवेक, विज्ञाननिष्ठ दृष्टिकोन आणि माणुसकी मागे पडत असेल, तर समाजाने आत्मपरीक्षण करणे गरजेचे आहे. धर्म माणसासाठी असावा; माणूस धर्मासाठी नसावा. माणसाची ओळख त्याच्या धर्मावरून नव्हे, तर त्याच्या माणुसकीवरून व्हायला हवी.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी संविधानाच्या माध्यमातून भारतीय समाजाला केवळ राजकीय लोकशाही दिली नाही, तर सामाजिक आणि आर्थिक लोकशाहीचा मार्गही दाखविला. त्यांच्या मते, स्वातंत्र्य, समता आणि बंधुता ही एकमेकांपासून वेगळी करता येणारी मूल्ये नाहीत. यापैकी एक मूल्य दुर्बल झाले, तर लोकशाहीचा पाया कमकुवत होतो.

आज लोकशाहीसमोर सर्वात मोठे आव्हान म्हणजे धर्माच्या नावावर निर्माण होणारा द्वेष, असहिष्णुता आणि सामाजिक विभाजन. बहुमताच्या जोरावर अल्पसंख्याकांचे अधिकार हिरावून घेणे किंवा विरोधी विचारांचा आवाज दडपणे म्हणजे लोकशाही नव्हे. लोकशाहीत बहुमताला सत्ता मिळते; मात्र त्या सत्तेवर संविधानाचे नियंत्रण असते. बहुमत म्हणजे मनमानी करण्याचा परवाना नाही.

शेवटी एवढेच सांगावेसे वाटते की, धर्मांधतेच्या अंधारात लोकशाहीचा दीप तेवत ठेवायचा असेल, तर भारतीय संविधानाचे तंतोतंत पालन करणे आवश्यक आहे. देशाला धार्मिक वर्चस्वाची नव्हे, तर सामाजिक समतेची गरज आहे. धार्मिक उन्मादाची नव्हे, तर वैज्ञानिक दृष्टिकोनाची गरज आहे. द्वेषाची नव्हे, तर बंधुभावाची गरज आहे.

धर्म माणसाला माणसापासून दूर नेणारा ठरू नये आणि राजकारण धर्मांधतेचे साधन बनू नये. प्रत्येक नागरिकाला समान न्याय, समान संधी आणि सन्मानाने जगण्याचा अधिकार मिळाला पाहिजे. यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेल्या संविधानातील मूल्यांचे संरक्षण करणे ही प्रत्येक भारतीयाची जबाबदारी आहे.

कारण धर्मांधतेने ग्रासलेल्या लोकशाहीला वाचविण्याची ताकद कोणत्याही धार्मिक वर्चस्वात नाही, तर भारतीय संविधानातील न्याय, स्वातंत्र्य, समता आणि बंधुतेच्या मूल्यांत आहे!

– मुन्नाभाई नंदागवळी
(आंबेडकरवादी साहित्याचे व संविधानाचे अभ्यासक)
(संवाद : ९७६४६७६४९९)

योगेश्वर विद्यालयाचा माणुसकीचा दिवाळी फराळ

गरजू विद्यार्थ्यांना फराळ वाटप; सामाजिक बांधिलकीचा आदर्श



दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

निफाड/प्रतिनिधी : दावचवाडी येथे दिवाळी हा आनंद, उत्साह, प्रकाश आणि आपुलकीचा सण. मात्र समाजातील प्रत्येक कुटुंबाला हा सण सारख्याच आनंदाने साजरा करता येतोच असे नाही. हीच सामाजिक जाणीव जपत दावचवाडी येथील योगेश्वर विद्यालयाने गरीब व गरजू विद्यार्थ्यांसाठी दिवाळी फराळ वाटपाचा स्तुत्य उपक्रम राबवून माणुसकीचा सुंदर आदर्श समाजासमोर ठेवला.

विद्यालयाचे मुख्याध्यापक आदरणीय जी. एम. टकले यांच्या पुढाकारातून विद्यालयातील सर्व शिक्षक बंधू-भगिनी आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या सहकार्याने हा उपक्रम राबविण्यात आला. दिवाळीच्या सणानिमित्त गरजू विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद फुलावा, त्यांनाही सणाचा गोडवा अनुभवता यावा, या उदात्त हेतूने विद्यार्थ्यांना दिवाळीचा फराळ वाटप करण्यात आला.

शिक्षण म्हणजे केवळ पुस्तकी ज्ञान देणे नव्हे, तर विद्यार्थ्यांमध्ये संवेदनशीलता, सहकार्य, माणुसकी आणि सामाजिक बांधिलकीची जाणीव निर्माण करणे होय. योगेश्वर विद्यालयाच्या शिक्षक व कर्मचाऱ्यांनी प्रत्यक्ष कृतीतून या मूल्यांची जोपासना केली आहे. त्यांच्या या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना दिवाळीचा आनंद मिळण्याबरोबरच सामाजिक जाणीवेचा अनमोल संस्कारही मिळाला.

या उपक्रमाच्या यशस्वितेसाठी बिऱ्हाडे, मोगल, बनसोडे, बोऱ्हाडे, देवरे, शिंदे, वडघुले, श्रीमती वाघ, श्रीमती मते, श्रीमती गवळी, वाळुंज, डावरे, कैलास भगत, किशोर निफाडे आदींनी विशेष परिश्रम घेतले. विद्यालयाच्या या स्तुत्य सामाजिक उपक्रमाचे संस्थेचे सन्माननीय विश्वस्त तसेच स्कूल कमिटी सदस्यांनी विशेष कौतुक केले. दिवाळीच्या प्रकाशपर्वात गरजू विद्यार्थ्यांच्या जीवनात आनंदाचा प्रकाश निर्माण करणारा योगेश्वर विद्यालयाचा हा उपक्रम समाजासाठी निश्चितच प्रेरणादायी ठरत आहे.

पानगाव येथे दिवाळीच्या संधेला पारधी वस्तीवर पेटला आशेचा दिवा: जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार साहेब यांची भेट



निवासी उपजिल्हाधिकारी श्री. विद्याचरण कडवकर साहेबही उपस्थिती; नागरिकांच्या समस्या जाणून घेऊन निवारणाची दिली ग्वाही

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

कळंब/प्रतिनिधी : कळंब तालुक्यातील मौजे पानगाव येथे दिवाळीच्या मंगल पर्वावर येथील पारधी वस्तीवर प्रशासकीय संवेदनशीलतेचा एक आदर्श वस्तुपाठ पाहायला मिळाला. समाजाच्या मुख्य प्रवाहापासून वंचित असलेल्या दुर्लक्षित पारधी बांधवांची दिवाळी गोड करण्यासाठी जिल्हाधिकारी माननीय श्री. कीर्ती किरण पुजार साहेब यांनी प्रत्यक्ष वस्तीवर जाऊन भेट दिली. या वेळी त्यांच्यासोबत निवासी उपजिल्हाधिकारी माननीय श्री. विद्याचरण कडवकर साहेब हेही उपस्थित होते.

भेटीदरम्यान जिल्हाधिकारी साहेबांनी वस्तीतील नागरिकांशी अतिशय आपुलकीने विचारपूस केली. त्यांचे राहणीमान, दैनंदिन खाण्यापिण्याची सोय आणि ते करत असलेल्या कामाबाबत सविस्तर माहिती घेतली. या वेळी पारधी समाजातील बांधवांनी आपल्या प्रलंबित समस्या प्रशासनासमोर मांडल्या. कि, आम्ही खाजगी जागेत पिढ्यान पिढ्या राहत असूनही स्वतःच्या मालकीची हक्काची जागा नसल्याची समस्या मांडली. तसेच सध्या दुष्काळी परिस्थितीत पिण्याच्या पाण्याच्या समस्येकडे त्यांनी लक्ष वेधले.तसेच उपजीविकेचा प्रश्न म्हणुन नजीकच्या फाटका कॅन्टीनम ध्ये व शेतामध्ये काम करणाऱ्या बांधवांनी रोजगाराच्या कायमस्वरूपी साधनांची मागणी केली.

या भेटीदरम्यान प्रशासनाच्या वतीने वस्तीतील नागरिकांना दिवाळी फराळाचे वाटप करण्यात आले, तसेच लहान मुलांना फटाके देण्यात आले. या वेळी भारावलेल्या पारधी बांधवांनी अत्यंत आपुलकीने आणलेला खाऊ जिल्हाधिकाऱ्यांना दिला. सरांनीही तो अतिशय प्रेमाने स्वीकारून खाल्ला, ज्यामुळे वस्तीतील लोकांमध्ये आनंदाचे व विश्वासाचे वातावरण निर्माण झाले.

ावेळी जिल्हाधिकारी श्री. कीर्ती किरण पुजार साहेब यांनी सर्वांचे म्हणणे शांतपणे ऐकून घेतले आणि त्यांच्या राहण्याच्या हक्काच्या जागेचा प्रश्न, उपजीविकेचे साधने आणि पिण्याच्या पाण्याची टंचाई या सर्व समस्यांवर योग्य ती कारवाई करून त्वरित निवारण केले जाईल, अशी भक्कम ग्वाही दिली. तसेच जिल्हाधिकाऱ्यांनी वस्तीतील लहान चिमुकल्यांशी मनमोकळा संवाद साधला. सर्व मुलांनी शाळा शिकलीच पाहिजे, असे सांगत त्यांनी शिक्षणाचे महत्त्व पालकांना पटवून दिले. या वेळी निवासी उपजिल्हाधिकारी श्री. विद्याचरण कडवकर साहेब यांनी शासकीय आश्रमशाळेबाबत सविस्तर माहिती दिली. आश्रमशाळेमध्ये मुलांच्या उत्तम शिक्षणाची, राहण्याची आणि आरोग्याची काळजी मोफत व योग्य प्रकारे घेतली जाते, याबद्दल त्यांनी मार्गदर्शन केले. यावेळी कळंब तालुक्यातील तहसीलचे नायब तहसीलदार गोकुळ भराडिया,मंडळ अधिकारी श्री मंडळे,व सर्व ग्राम महसूल अधिकारी यावेळी उपस्थित होते.

दिवाळीत विविध किल्ल्यांच्या प्रतिकृती साकारत नव्या पिढीसमोर ठेवला शिवरायांचा इतिहास

पडघ्यातील तरुणाईने जपला मातीच्या किल्ल्यांचा ऐतिहासिक वारसा

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

ठाणे प्रतिनिधी/मिलिंद जाधव : दिवाळीचा सण आणि मातीचे किल्ले हे महाराष्ट्राच्या सांस्कृतिक परंपरेचे एक अतूट नाते आहे. छत्रपती शिवाजी महाराजांचा पराक्रम, स्वराज्याची स्थापना आणि गड-किल्ल्यांचा इतिहास नव्या पिढीपर्यंत पोहोचवण्याचे महत्त्वपूर्ण काम ही परंपरा करत असते. याच ऐतिहासिक वारशाचे जतन करण्यासाठी भिवंडी तालुक्यातील पडघा येथील तरुणाई यंदाच्या दिवाळीत मातीच्या किल्ल्यांच्या माध्यमातून इतिहासाला जिवंत केले आहे. पडघ्यातील विविध भागांत आकर्षक किल्ल्यांच्या प्रतिकृती साकारत मुलांनी शिवरायांच्या शौर्याची गाथा नव्या पिढीसमोर मांडली आहे. पडघा





येथील शास्त्रीनगर परिसरात श्री बल्लाळेश्वर संघाच्या वतीने अर्णव जोशी, रोहित कांबळे, सार्थक हाडपे, शौर्य हाडपे, प्रणव माळी, लाभश्री जोशी, प्रियांशी पातकर, सानवी शिंदे, संस्कृती महाजन, तनिष्का जोशी, सारा पाठरी, प्रिया कांबळे, चैतन्या महाजन, गायत्री महाजन आणि देवव्रत जोशी या बालकांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या पराक्रमाची साक्ष देणाऱ्या ऐतिहासिक प्रतापगड किल्ल्याची आकर्षक प्रतिकृती साकारली आहे. किल्ल्याची रचना, बुरुज आणि ऐतिहासिक मांडणीच्या माध्यमातून मुलांनी आपली कल्पकता आणि ऐतिहासिक आवड दाखवून दिली आहे.

तसेच पडघ्यातील ब्राह्मण आळी, सोनार आळी, रोहिदास नगर, बालाजी नगर आणि न्यू बालाजी नगर व पडघा रिसरातही मुलांनी मातीचे किल्ले उभारले आहेत. दिवाळीच्या सुट्टीत मुले एकत्र येऊन माती, दगड आणि विविध साहित्यांचा वापर करत पारंपरिक पद्धतीने किल्ल्यांची निर्मिती करतात. या किल्ल्यांवर छत्रपती शिवाजी महाराज आणि शूर मावळ्यांच्या मूर्ती विराजमान करून स्वराज्याच्या इतिहासाला उजाळा दिला जातो.

मोबाईल आणि आधुनिक तंत्रज्ञानाच्या युगातही पडघ्यातील मुलांनी जपलेली ही परंपरा विशेष कौतुकास्पद आहे. मातीच्या किल्ल्यांच्या माध्यमातून मुलांमध्ये संघभावना, कल्पकता, नेतृत्वगुण, इतिहासाची आवड आणि देशभक्तीची भावना रुजत आहे. त्यामुळे मातीचे किल्ले ही केवळ दिवाळीतील सजावट न राहता छत्रपती शिवाजी महाराजांच्या विचारांचा आणि महाराष्ट्राच्या ऐतिहासिक अस्मितेचा वारसा जपणारे माध्यम ठरत आहेत. पडघ्यातील तरुणाईने जपलेली ही परंपरा म्हणजे पुढच्या पिढीपर्यंत स्वराज्याचा इतिहास पोहोचवण्याचा एक सुंदर प्रयत्न ठरत आहे.

नळदुर्ग शहराची स्वच्छता ठेवणाऱ्या महिला कर्मचाऱ्यांचा मल्हार दादाच्या हस्ते साडी चोळी देऊन सन्मान

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

नळदुर्ग/दादासाहेब बनसोडे : तुळजापूर तालुक्याचे लोकप्रिय आमदार राणा जगजितसिंह पाटील यांच्या संकल्पनेतून नळदुर्ग शहर स्वच्छतेच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावणाऱ्या महिला सफाई कामगार यांना भाऊबीजेची अनोखी भेट म्हणून साडी चेकीचे वाटप करण्यात आले धाराशिव जिल्ह्याचे युवा नेतृत्व मल्हार दादा पाटील यांच्या हस्ते नळदुर्ग येथे नगरपालिकेच्या प्रांगणात करण्यात आले.

आली वर्षाची दिवाळी बहीण भावाला ओवाळी भाऊबिजेची अनोखी भेट

यावेळी नगर पालिकेचे नगराध्यक्ष बसवराज अप्पा धरणे, उपनगराध्यक्ष नय्यर जागीरदार, जिल्हा परिषद सदस्य सुनील बनसोडे, तथा शिक्षण व क्रिडा सभापती इमाम शेख, नगरसेवक निरंजन राठोड, आकाश कुलकर्णी, सुधीर पोतदार, गफूर कुरेशी, भाजपाचे सुशांत भूमकर, किशोर नळदुर्गकर, सईद बागवान, प्रवीण गायकवाड, बलदेव सिंग ठाकूर, नगरसेविका राणीताई सुरवसे, मीनाक्षीताई काळे, छमाताई राठोड, अपर्णाताई बेडगे आदी उपस्थित होते, एकूण ८० महिला भगिनींना साड्याचे वाटप करण्यात आले, या वेळी माजी नगरसेवक विनायक अहंकारी,भाजपचे जिल्हा सचिव श्रमिक पोतदार, जिलानी कुरेशी, सिकंदर काझी, शिवाजी सुरवसे, सुनील उखंडे, विनायक पुदाले, अभिजित लाटे, पप्पू पाटील आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्तविक व सूत्रसंचलन पाणी पुरवठा सभापती तानाजी जाधव यांनी केले

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

चंद्रभागा वाळवंट स्वच्छता अभियानातून २.५ टन कचरा संकलित

दर बुधवारी सकाळी ७.३० वाजता श्रमदान अभियान; सामाजिक संस्था व नागरिकांना सहभागी होण्याचे आवाहन

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

प्रतिनिधी/पंढरपूर : पंढरपूर शहरातील चंद्रभागा वाळवंट परिसर स्वच्छ, सुंदर व निर्मळ ठेवण्याच्या उद्देशाने पंढरपूर नगरपरिषद आणि होडी चालक-मालक संघ यांच्या संयुक्त विद्यमाने विशेष स्वच्छता अभियान राबविण्यात आले. या अभियानात विविध सामाजिक, धार्मिक व शैक्षणिक संस्थांचे प्रतिनिधी, नगरपरिषदेचे अधिकारी-कर्मचारी, नगरसेवक आणि नागरिकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. या मोहिमेत तब्बल २.५ टन कचरा संकलित करण्यात आला असल्याची माहिती मुख्याधिकारी महेश रोकडे यांनी दिली.





चंद्रभागा वाळवंट परिसरात राबविण्यात आलेल्या या अभियानात स्वयंसेवक, नगरपरिषदेचे कर्मचारी व नागरिकांनी श्रमदान करून प्लास्टिक, कचरा आणि इतर घनकचरा संकलित केला. संकलित कचऱ्याची योग्य पद्धतीने विल्हेवाट लावण्याची व्यवस्था करण्यात आली. या उपक्रमातून सार्वजनिक ठिकाणांची स्वच्छता, कचरा व्यवस्थापन, प्लास्टिकमुक्त परिसर आणि पर्यावरण संवर्धनाबाबत जनजागृती करण्यात आली.

या अभियानात नगरपरिषदेच्या विविध विभागातील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी सहभाग घेतला. तसेच नगरसेवक ओंकार जोशी यांच्यासह विविध संस्थांचे पदाधिकारी व नागरिक उपस्थित होते.

दर बुधवारी स्वच्छता व श्रमदान अभियान

पंढरपूर शहर स्वच्छ, सुंदर आणि निर्मळ करण्यासाठी नगरपरिषदेच्या वतीने दर बुधवारी सकाळी ७.३० वाजता स्वच्छता व श्रमदान अभियान राबविण्यात येणार आहे. या अभियानात शहरातील नागरिक, सामाजिक संस्था, स्वयंसेवी संस्था, शैक्षणिक संस्था, विविध मंडळे आणि इच्छुक संघटनांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, या अभियानात सहभागी होऊ इच्छिणाऱ्या संस्थांनी नगरपरिषदेच्या आरोग्य विभागाशी संपर्क साधून नोंदणी करावी.

पंढरपूर शहर स्वच्छ, सुंदर, निरोगी व निर्मळ ठेवण्यासाठी नागरिकांनी स्वच्छता अभियानात सक्रिय सहभाग नोंदवून 'स्वच्छ पंढरपूर - सुंदर पंढरपूर' ही संकल्पना प्रत्यक्षात आणण्यासाठी सहकार्य करावे, असे आवाहन मुख्याधिकारी महेश रोकडे यांनी केले आहे.

दीपावली - बलीप्रतिपदा / दिवाळी पाडवा निमित्त श्री विठ्ठल-रुक्मिणी मातेस अलंकार परिधान

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क





पंढरपूर (ता.११): दीपावली पाडवा निमित्त आज श्री विठ्ठल व श्री रुक्मिणी मातेस हिरेजडित सुवर्ण अलंकारांनी सुशोभित करण्यात आले. दरवर्षी प्रमाणे यंदाही दीपावली बलीप्रतिपदा / दिवाळी पाडवा या पवित्र दिवशी पोशाखावेळी पारंपरिक पद्धतीने श्री विठ्ठल व माता रुक्मिणीला अलंकार परिधान करण्यात आल्याची माहिती श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिरे समितीचे व्यवस्थापक प्रविणकुमार घम यांनी दिली.

श्री विठ्ठलास सोन्याची पगडी, कौस्तुभ मणी, नाम निळाचा, दंडपेठया जोड, हिऱ्याचे कंगनजोड, अष्टपैलू मण्याची कंठी, चंद्रहार, मोहनमाळ, सोन्याचे पैंजण, लॉकेट पट्टी मत्स्य जोड, सोन्याचे पितांबर, चंद्रहार, तुळशीची माळ, तोडेजोड, मोरमंडळी, मोत्याचा तुरा, नवरत्नाचा हार, हिऱ्याचे पैंजण इ. अलंकार परिधान करण्यात आलेले आहेत.

श्री रुक्मिणी मातेस जडवाचे मुकुट, मोठी नथ, वाक्या जोड, मन्यामोत्यांच्या पाटल्या, जडावाचे ताणवाड जोड, चंद्र, सूर्य, बाजीराव गरसोळी, पेट्यांची बिंदि, चिंचपेटी हिरवी, पाचूची गरचोळी, खड्यांची वेणी, तन्मनी मोठा, पैंजण, रूळ रोड, मत्स्य जोड, सोने करंडा, वाक्या जोड, मद्रासी कंठा, जडावाचा हार, जडावाचे बाजूबंद जोड, तुळशीची माळ, मासपट्टा, ठुशी, मोत्याचा कंठा, मोत्याचे मंगळसूत्र, शिंदेहार, सोन्याची साडी, छत्रछामर इत्यादि अलंकार परिधान करण्यात आलेले आहेत.

श्री.राधिका मातेस सिद्धेश्वर टोप लक्ष्मीहार पुतळ्यांची माळ ठुशी व * श्री.सत्यभामा मातेस नक्षी टोप, पुतळ्यांची माळ, ठुशी, जवमनी पदक अलंकार परिधान करण्यात आलेले आहेत.

श्री. महालक्ष्मी मातेस सोन्याची कंठी, मोत्याची कंठी, शिरपेस, दंडपेट्या जोड, जवेचीमाळ, तांदळया हार, मोहनमाळ, कोयरीहार, चांदीची छत्री व श्री व्यंकटेशास लक्ष्मी हार, सूर्यकल्यांचा हार, मोहरांची माळ, पुतळ्यांची माळ, तुळशीची माळ, इमिटेशन नेकलेस, एकदाणी इत्यादी अलंकार परिधान करण्यात आलेले आहेत.

मंदिर व नामदेव पायरी इत्यादि ठिकाणी दिवाळीच्या लक्ष्मीपूजना निमित्त विठ्ठल दर्शनासाठी मोठ्या संख्येने भाविक येत असतात. या पार्श्वभूमीवर मंदिराची केलेली रगीबेरंगी फुले आणि आकर्षक पानांचा वापर करून मनमोहक सजावट करण्यात आली आहे. या फुलांच्या सजावटीमुळे मंदिर परिसराला आकर्षक, प्रसन्न आणि मंगलमय स्वरूप प्राप्त झाले आहे,

या सजावटीमुळे संपूर्ण मंदिराचं रुपडं पालटून गेलं तसेच दिवाळीच्या आनंद पर्वानिमित्त मोठ्या संख्येने विठ्ठल भक्तांनी दर्शनासाठी मंदिरात हजेरी लावत असल्याचे कार्यकारी अधिकारी श्रीकांत यादव यांनी सांगितले.

दीपावली २०२६ : दिवाळी पाडव्यानिमित्त श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिरात दीड टन रंगीबेरंगी फुलांची आकर्षक सजावट

देशी-विदेशी फुलांसह शोभिवंत पानांचा मनमोहक वापर; श्री. देवीदास कालूराम नखाते, रहाटणी यांच्याकडून सजावट सेवा अर्पण

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

पंढरपूर : दीपावली २०२६ आणि दिवाळी पाडव्याच्या मंगलमय पर्वानिमित्त श्री क्षेत्र पंढरपूर येथील श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिरात सुमारे दीड टन रंगीबेरंगी फुले आणि आकर्षक पानांचा वापर करून मनमोहक सजावट करण्यात आली आहे. या फुलांच्या सजावटीमुळे मंदिर परिसराला आकर्षक, प्रसन्न आणि मंगलमय स्वरूप प्राप्त झाले आहे.

या सजावटीसाठी गुलाब, ऑर्किड, शेवंती, बटन शेवंती, जिप्सी, अँटोनिया, ड्रॅसेना, स्पिंगर, पिंक डेझी यांसह विविध प्रकारच्या देशी-विदेशी फुलांचा तसेच लाल व पिवळा झेंडू आणि शोभिवंत पानांचा वापर करण्यात आला आहे.

फुलांची आकर्षक रंगसंगती, कलात्मक मांडणी आणि विविध प्रकारच्या पानांचा सुरेख वापर यामुळे मंदिराचे सौंदर्य अधिक खुलून दिसत आहे. ही फुलांची सजावट सेवा रहाटणी येथील भाविक श्री. देवीदास कालूराम नखाते यांनी देणगी स्वरूपात श्री विठ्ठल-रुक्मिणी चरणी अर्पण केली आहे.



मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियानात ग्रुप डोहोळे ग्रामपंचायतीची बाजी

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क



ठाणे जिल्हास्तरावर द्वितीय क्रमांक; ३० लाख रुपयांचे रोख पारितोषिक जाहीर

ठाणे प्रतिनिधी/मिलिंद जाधव : मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियानांतर्गत घेण्यात आलेल्या स्पर्धेत भिवंडी तालुक्यातील ग्रुप डोहोळे ग्रामपंचायतीने उल्लेखनीय यश संपादन केले आहे. ठाणे जिल्हास्तरावरील उत्कृष्ट ग्रामपंचायत पुरस्कारासाठी ग्रुप डोहाळे ग्रामपंचायतीची निवड झाली असून, या स्पर्धेत ग्रामपंचायतीने द्वितीय क्रमांक पटकावला आहे. या यशाबद्दल ग्रामपंचायतीला ३० लाख रुपयांचे रोख पारितोषिक मिळणार आहे.

ग्रामपंचायत अधिकारी परेश सोनावणे यांच्या मार्गदर्शनाखाली ग्रामपंचायतीने केलेल्या नियोजनबद्ध कामकाजामुळे आणि विकासाभिमुख प्रयत्नांमुळे हे यश संपादन करणे शक्य झाले आहे. त्यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात आलेल्या विविध उपक्रमांची या यशात महत्त्वपूर्ण भूमिका राहिली आहे.

डोहाळे ग्रुप ग्राम पंचायतीने जिल्हास्तरावर मिळवलेल्या या यशामुळे गावात आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून, ग्रामपंचायत अधिकारी परेश सोनावणे यांच्यासह ग्रामपंचायतीच्या काम गिरीचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे. या पुरस्काराम ुळे गावाच्या विकासकामांना आणखी चालना मिळण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

अग्रीम मदतीसाठी बँक खाते आधारशी लिंक करा, डीबीटी सक्रिय करा - तहसीलदार विशाल नाईकवाडे

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

निफाड/प्रतिनिधी : खरीप हंगाम २०२६ मधील दुष्काळी परिस्थितीम ुळे निफाड तालुक्यातील पात्र शेतकऱ्यांच्या बँक खात्यावर प्रत्येकी ५,००० रुपये अग्रीम मदतीची रक्कम जमा करण्यात येत आहे. मात्र, काही शेतकऱ्यांच्या बँक खात्याशी आधार क्रमांक लिंक नसल्यामुळे किंवा बँक खात्याच्या तांत्रिक अडचणींमुळे ,अग्रीम मदतीच्या रकमेचे पेमेंट रिजेक्टेड झाले असून संबंधित शेतकऱ्यांनी बँक खाते आधारशी लिंक करून घ्यावे, असे आवाहन तहसीलदार विशाल नाईकवाडे यांनी केले आहे.

या शेतकऱ्यांना पेमेंट रिजेक्ट झाल्याचा शेरा प्राप्त झाला आहे त्यांनी तातडीने खालील कार्यवाही करावी.

आपले बँक खाते आधार क्रमांकाशी लिंक करून घ्यावे.

बँक खात्याचे डीबीटी सक्रिय असल्याची खात्री करावी.

आवश्यक असल्यास संबंधित बँकेच्या शाखेत जाऊन खात्यातील त्रुटी दुरुस्त करून घ्याव्यात. केवळ बँक खात्याला आधार लिंक करणे पुरेसे नसून, आपले बँक खाते डीबीटी साठी सक्रिय असल्याची खात्री करून घ्यावी, असेही नाईकवाडे यांनी स्पष्ट केले. शासनाकडून मिळणारी अग्रीम मदत आपल्या खात्यावर जमा होण्यासाठी सर्व संबंधित शेतकरी बांधवांनी ही कार्यवाही तातडीने पूर्ण करावी, असे आवाहन तहसीलदार विशाल नाईकवाडे यांनी केले आहे.

टायफा व पाणवेली हटविण्याच्या मोहिमेला यश

दहा-बारा वर्षांनंतर व्हाइट स्टॉर्कचे पुन्हा दर्शन, नव्या विदेशी पक्ष्यांचेही आगमन

नांदूरमधमेश्वर अभयारण्यात पक्ष्यांचा मेळा; पक्षीगणनेत ११ हजार ७८० पक्ष्यांची नोंद!

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

निफाड/प्रतिनिधी

निसर्गसंपन्न नांदूरमधमेश्वर अभयारण्यात पक्ष्यांचा किलबिलाट पुन्हा वाढू लागला असून, पक्ष्यांच्या अधिवास संवर्धनासाठी वन्यजीव विभागाकडून सुरू असलेल्या प्रयत्नांना सकारात्मक प्रतिसाद मिळत आहे. अरण्यऋषी मारुती चितमपल्ली यांच्या जयंतीनिमित्त गुरुवारी (दि. ५ नोव्हेंबर) पक्षी सप्ताहाचा उत्साहात प्रारंभ करण्यात आला. यानिमित्त आयोजित पक्षीगणनेत स्थलांतरित, विदेशी आणि स्थानिक अशा विविध प्रजातींच्या तब्बल ११ हजार ७८० पक्ष्यांची नोंद करण्यात आली. विशेष म्हणजे, दहा ते बारा वर्षांनंतर व्हाइट स्टॉर्कसारख्या पक्ष्यांचे अभयारण्यात पुन्हा दर्शन घडले असून, नवीन प्रजातींच्या आगमनामुळे पक्षीप्रेमींमध्ये आनंदाचे वातावरण आहे.





वन्यजीव विभाग, नाशिक यांच्या वतीने आयोजित या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी उपवनसंरक्षक कृष्णा भवर होते. सकाळी सात वाजता पक्षीगणनेला सुरुवात झाली. पक्षीमित्र, पक्षी अभ्यासक, छायाचित्रकार, वनाधिकारी, कर्मचारी, पक्षी मार्गदर्शक आणि स्थानिक ग्रामस्थांनी यामध्ये सहभाग नोंदविला. प्रारंभी अरण्यऋषी मारुती चितमपल्ली आणि बर्डमॅन डॉ. सलीम अली यांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

अधिवास संवर्धनामुळे दुर्मिळ पक्ष्यांचे पुन्हा आगमन

अभयारण्यातील पाणथळ क्षेत्रांमध्ये टायफा वनस्पती आणि पाणवेलींची वाढ झाल्यामुळे पक्ष्यांच्या खाद्यशोधाच्या जागांवर परिणाम होत होता. पक्ष्यांचे फीडिंग ग्राउंड सुरक्षित राहावे आणि त्यांना पुरेशा प्रमाणात खाद्य उपलब्ध व्हावे, यासाठी वन्यजीव विभागाने मागील वर्षी नियोजनबद्ध पद्धतीने पाणवेली व टायफा हटविण्याची मोहीम राबविली.

या प्रयत्नांमुळे अभयारण्यातील पक्ष्यांच्या अधिवासात सकारात्मक बदल दिसून येत आहेत. मागील दहा ते बारा वर्षांपासून न दिसणाऱ्या व्हाइट स्टॉर्कसारख्या पक्ष्यांचे पुन्हा आगमन झाले आहे. तसेच यापूर्वी अभयारण्यात आढळून न आलेल्या काही पक्षी प्रजातींचे दर्शनही मागील वर्षापासून घडत आहे. उर्वरित पाणथळ क्षेत्रातील टायफा आणि इतर वनस्पती हटविण्यासाठी वनविभागाकडून पुढील नियोजन करण्यात येत असल्याची माहिती यावेळी देण्यात आली.

दत्ता काका उगावकर यांचा जीवनगौरव पुरस्काराबद्दल गौरव

पक्षीमित्र संघटनेच्या वतीने ज्येष्ठ पक्षीमित्र दत्ता काका उगावकर यांना जीवनगौरव पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल, तर पक्षीमित्र, छायाचित्रकार व पत्रकार आनंद बोरा यांना उत्कृष्ट पत्रकार पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल मान्यवरांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला. दत्ता काका उगावकर यांनी आपल्या प्रदीर्घ पक्षीनिरीक्षण प्रवासातील अनुभव सांगताना डॉ. सलीम अली यांच्यासोबतच्या आठवणींना उजाळा दिला.

डॉ. उत्तम डेर्ले यांनी अभयारण्यातील पाणथळ क्षेत्रांचे संवर्धन, टायफा वनस्पती हटविणे, पाणीटंचाईवर मात करण्यासाठी बोअरवेलची व्यवस्था आणि तलावांची निर्मिती करण्याबाबत सूचना मांडल्या. आनंद बोरा यांनी वनपरिक्षेत्र अधिकारी हिरालाल चौधरी आणि जलसंपदा विभागाच्या अधिकाऱ्यांमधील सकारात्मक चर्चेमुळे अभयारण्यातील पाणीपातळीत वाढ झाल्याचे सांगितले. करंजगावचे सरपंच खंडू बोडके यांनी गोदावरी नदीपात्रातील पाणवेली हटविण्याची आवश्यकता व्यक्त केली.

पक्षी संवर्धनासाठी सामूहिक प्रयत्नांची गरज

उपवनसंरक्षक कृष्णा भवर यांनी पक्षी सप्ताह साजरा करण्यामागील उद्देश स्पष्ट केला. तसेच यंदा अभयारण्यात दाखल झालेल्या नवीन विदेशी पक्ष्यांची माहिती उपस्थितांना दिली. वनपरिक्षेत्र अधिकारी हिरालाल चौधरी यांनी पक्ष्यांचे मानवी जीवन आणि शेती व्यवसायातील महत्त्व विशद केले. शेतकऱ्यांनी रासायनिक खतांचा वापर कमी करून सेंद्रिय शेतीकडे वळावे, असे आवाहनही त्यांनी केले.

कार्यक्रमास उपवनसंरक्षक कृष्णा भवर, वनपरिक्षेत्र अधिकारी हिरालाल चौधरी, ज्येष्ठ पक्षीमित्र दत्ता काका उगावकर, डॉ. उत्तम डेर्ले, आनंद बोरा, अनंत सरोदे, बीएनएचएसचे प्रतिनिधी, करंजगावचे सरपंच खंडू बोडके, वनपाल, वनरक्षक, पक्षी मार्गदर्शक, संरक्षण पथकाचे सदस्य आणि ग्रामस्थ उपस्थित होते.

पक्षीगणनेतील मोठी संख्या, नव्या प्रजातींचे आगमन आणि अधिवास संवर्धनाच्या प्रयत्नांमुळे नांदूरमधमेश्वर अभयारण्याची जैवविविधता अधिक समृद्ध होण्याच्या आशा पल्लवित झाल्या आहेत.

पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी यांनी पारधी समाज बांधवांसोबत साजरी केली दिवाळी

सिद्धार्थ सोशल फाउंडेशनच्या वतीने वसंत अंबाजी भांगे यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ सामाजिक उपक्रम; भाऊबीजेनिमित्त ओवाळणी व दिवाळी फराळाचे आयोजन




















दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

अक्कलकोट/ प्रतिनिधी

सामाजिक बांधिलकी जपत सिद्धार्थ सोशल फाउंडेशनच्या वतीने वसंत अंबाजी भांगे यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ दिवाळीनिमित्त विशेष सामाजिक उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. वागदरी (ता. अक्कलकोट) येथे पारधी समाज बांधवांसोबत दिवाळीचा आनंद द्विगुणित करण्यासाठी भाऊबीजेनिमित्त ओवाळणी व दिवाळी फराळ कार्यक्रम उत्साहात पार पडला. या कार्यक्रमास ग्रामीण पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी पारधी समाजातील महिला भगिनींनी पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी यांचे औक्षण करून भाऊबीजेचा सण साजरा केला. त्यानंतर उपस्थित सर्वांनी एकत्रितपणे दिवाळी फराळाचा आस्वाद घेतला. या उपक्रमातून सामाजिक एकोपा, बंधुभाव आणि माणुसकीचा संदेश देण्यात आला.

याप्रसंगी बोलताना पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी म्हणाले की, सिद्धार्थ सोशल फाउंडेशनच्या माध्यमातून चंद्रशेखर भांगे व त्यांच्या सहकाऱ्यांनी राबविलेला हा सामाजिक उपक्रम कौतुकास्पद आहे. भाऊबीजेनिमित्त पारधी समाज बांधवांना भेटून मनापासून आनंद झाला. पारधी समाजाच्या विकासासाठी पोलीस प्रशासन कायम प्रयत्नशील राहील. समाजातील नागरिकांच्या स्थानिक समस्या जाणून घेऊन त्या सोडविण्यासाठी निश्चित प्रयत्न केले जातील, अशी ग्वाही त्यांनी यावेळी दिली.





कार्यक्रमादरम्यान पोलीस अधीक्षकांनी पारधी समाज बांधवांशी संवाद साधत त्यांच्या विविध समस्या, अडचणी आणि अपेक्षा जाणून घेतल्या. समाजाच्या मुख्य प्रवाहातील सहभागासाठी अशा सामाजिक उपक्रमांची आवश्यकता असल्याचेही यावेळी अधोरेखित झाले.

या कार्यक्रमास लोकशाही न्यूजचे पत्रकार चंद्रशेखर भांगे, सिद्धार्थ सोशल फाउंडेशनचे अध्यक्ष कमलाकर सोनकांबळे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक पनालकर, साहेबालाल सुभेदार, सुनील सावंत, तंटामुक्त समितीचे अध्यक्ष लक्ष्मण सलगरे सदानंद माळगे, यांच्यासह अरुण भंडारे, शाम बाबर, असलम मुल्ला, ललिता भटारे, सागर वमने, सुनील इंडे, परमेश्वर नडगेरी आदी मान्यवर व पारधी समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. सदर कार्यक्रम सामाजिक बांधिलकी, माणुसकी आणि बंधुभाव जपत साजरी झालेली ही दिवाळी पारधी समाज बांधवांसाठी आनंदाची व आपुलकीची ठरली.

पद्मश्री भिकल्या लाडक्या धिंडा यांची प्रमुख उपस्थिती

१२५ आदिवासी महिला व पुरुषांना साडी, लुगडे, कपडे आणि मिठाईचे वाटप

विजेता विचार फाउंडेशनतर्फे कोल्याचा पाडा येथे आदिवासी पारंपरिक दिवाळी महोत्सव उत्साहात साजरा!

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

ठाणे प्रतिनिधी/मिलिंद जाधव

विजेता विचार फाउंडेशनच्या वतीने भिवंडी तालुक्यातील जिल्हा परिषद शाळा, कोल्याचा पाडा, वाघिवली येथे आदिवासी पारंपरिक दिवाळी महोत्सव मोठ्या उत्साहात आणि आनंदी वातावरणात साजरा करण्यात आला. या महोत्सवाला पद्मश्री पुरस्कारप्राप्त प्रसिद्ध तारपा वादक भिकल्या लाडक्या धिंडा यांची प्रमुख उपस्थिती लाभली. पारंपरिक आदिवासी संस्कृती, कला आणि सामाजिक एकतेचा सुंदर संगम या कार्यक्रमातून अनुभवायला मिळाला.

कार्यक्रमाची सुरुवात पारंपरिक पद्धतीने दीपप्रज्वलन करून करण्यात आली. यावेळी १२५ आदिवासी महिला व पुरुषांना साड्या, लुगडे व कपड्यांचे वाटप करण्यात आले. तसेच उपस्थितांना मिठाईचे वाटप करून दिवाळीचा आनंद द्विगुणित करण्यात आला.

या कार्यक्रमात ऑल मेडिकल असोसिएशनचे सर्व सभासद डॉक्टर, डॉ. मोमीन, डॉ. नितीन मोकाशी, नूतन मोकाशी, डॉ. नितीन पाटील, वाडा येथील गटशिक्षणाधिकारी बाराते पत्रकार मनोज बुंदे, भिवंडी महानगरपालिकेचे सभापती वैभव भोईर, फाउंडेशनचे सचिव विलास पाटील, कार्याध्यक्ष तथा पोलीस पाटील रोहिदास पाटील, गायक सुनील भगत , शाळेचे मुख्याध्यापक माधव गुरव यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

यावेळी नरेश वाळन यांना 'सर्वोत्तम आदर्श शिक्षक पुरस्कार' प्रदान करून गौरविण्यात आले. तसेच आदिवासी समाजातून शिक्षण आणि विविध क्षेत्रांत उल्लेखनीय यश संपादन करणाऱ्या डॉक्टर, वकील, इंजिनिअर आणि पोलीस दलातील तरुणांचा विशेष सत्कार करण्यात आला. समाजातील गुणवंतांचा गौरव करून नव्या पिढीला प्रेरणा देण्याचा उपक्रम यानिमित्ताने राबविण्यात आला.

महोत्सवाचे विशेष आकर्षण ठरले ते पद्मश्री भिकल्या लाडक्या धिंडा यांचे पारंपरिक तारपा वादन! त्यांच्या तारपाच्या सुरेल तालावर शेकडो आदिवासी बांधव, महिला आणि भगिनींनी पारंपरिक नृत्य सादर करत जल्लोषात दिवाळीचा आनंद साजरा केला. पारंपरिक वेशभूषा, तारपाचे सूर आणि सामूहिक नृत्यामुळे संपूर्ण परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते. सदर

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विजेता विचार फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष श्यामकांत नवाळे यांनी केले.

